५. **अटी व शर्ती** :-

अ. पुरवठादाराने कामगार आयुक्त कार्यालयात नोंदनी केलेली असावी.

आ. महाराष्ट्र दुकान व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार आतागायत नुतनीकरणासह प्रमाणपत्र सादर करावे.

इ. निविदाकाराने निविदेमधील पदास देण्यात येणाऱ्या मासिक वेतनाचे व कपातीचे दर भरणे बंधनकारक आहे.

ई. ज्या निविदाधारकांचे निविदा समितीमार्फत दर अंतिम केल्यानंतर निविदाधारकास रू.१००/- च्या स्टम्प पेपरवरती करारनामाकरून देणे बंधनकारक राहील.

उ. जे निविदाधारक अंतिम होतील त्या निविदाधारकाने पुरविण्यात आलेल्या पदाच्या व्यक्तीचा इ पी एफ कपातकरण्याची जबाबदारी ही निविदाधारकाची राहील.

ऊ. पुरविण्यात आलेले कर्मचारी कोणत्याही प्रकारचा नियमीत नियुक्तीचा दावा करू शकणार नाहीत.

ए. पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्याने काम करण्यास कुचराई केल्यास, त्याबदली दुसरा कर्मचारी देण्याची जबाबदारी ही पुरवठादाराची राहील.

ऐ. पुरवठादाराकडून पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची सर्वस्वी जबाबदारी ही पुरवठादारकाची राहील, याप्रकरणी कोणताही बोजा शासनावर राहणार नाही.

ओ. अटी नियम यांचा अर्थ लावण्याचा व निविदा/कंत्राटीमध्ये काही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.

औ. वरील अटी व शर्तीनुसार कर्मचारी पुरवठ्याबाबत व देयकाबाबत वाद निर्माण झाल्यास मा.संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम राहील. न्यायालयीन कामकाजाकरिता ,छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्र मर्यादित राहील.

६. **पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या** :-

अ. **सहाय्यक -०१ पद :-** कोनत्याही शाखेचा पदविधर माजी सैनिक व इतर नागरिक तसेच कार्यालयीन कामाचा तसेच उत्तम संगणक हाताळण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. त्याअनूषंगाने पदाची कर्तव्य व जबाबदारी खालीलप्रमाणे आहेत.

**कर्तव्य व जबाबदारी** :-

i. मराठी व इग्रजी टायपिंग करणे.
ii. संस्थेत येणारे पालक व विद्यार्थी संस्थेच्या लेखी परीक्षेची माहिती देणे.
iii. छात्राकडून घेण्यात आलेल्या शेक्षणिक दस्तावेज व शुल्क यांच्या नोंदी व जतन करून ठेवणे.
iv. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
v. संस्थेच्या लेखी परिक्षा संबधीत इतर कामे करणे.
vi. कार्यालयाची झेरॉक्स मशीन चालविणे व त्याची साफ सफाई ठेवणे.

(मकरंद देशमुख)
कर्नल (निवृत्त)
संचालक

Scanned with CamScanner

Maharashtra State
महाराष्ट्र शासन
Services Preparatory Institute,
सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
N-12, Sector,Cidco, Chh. Sambhajinagar Phone No 0240-2991370
एन-१२ सेक्टर,सिडको,छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र.०२४०-२९९१३७०
Web site :www.spiaurangabad.com E mail : sanchalakspi@gmail.com

## निवीदा नोटीस

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर येथे सप्टेंबर-२०२६ ते ऑगस्ट -२०२७ पर्यंत अकरा महिन्याच्या करारपद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे खालील पद भरण्याकरिता बंद लिफाफ्यामध्ये पोस्टाद्वारे अथवा प्रत्यक्षरित्या निविदा मागविण्यात येत आहेत (माजी सैनिक असल्यास प्राधन्य). तरी ईच्छुकांनी निविदा विहीत मुदतीत दाखल करावी.

**१) सहाय्यक- १ पद**

| अ.क्र. | भरावयाचे पद | कालावधी | देण्यात येणाऱ्या वेतनाची वार्षिक अंदाजीत रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम २% | निविदा स्विकृती दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक | ११ महिने | २,७७,०००/- (GST सहित) | ५५४०/- | २७/०८/२०२६ सायंकाळी ६:०० वाजेपर्यत | २८/०८/२०२६ सकाळी ११.३० वाजता |

१. निविदाधारकांनी दिनांक २७/०८/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यत निविदा पोस्टाद्वारे अथवा प्रत्यक्षरित्या सादर करावी.

२. २% सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झालेल्या पुरवठादाराच्या प्रथम देयकातून कपात करण्यात येईल. काही कारणास्तव ११ महिन्यापूर्वी करार रद्द झाला अथवा उपरोक्त नमूद पदे पुरविण्यात काही अडचण निर्माण झाली तर सदरहू सुरक्षा रक्कम पुरवठादारास परत केली जाणार नाही. पुर्ण करार संपुष्टात आल्यास सदरहू सुरक्षा रक्कम पुरवठादारास परत करण्यात येईल.

३. वरील निविदा सुचनेमध्ये बदल करणे किंवा निविदा काही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी राखुन ठेवला आहे.

४. अटी, शर्ती व उपरोक्त नमुद पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सोबत जोडल्या प्रमाणे राहतील.

पान नं. २ वर

Scanned with CamScanner